## जगभर हिंडताना...



# मराठ्यांची राजधानी... रायगड

महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी म्हणजे रायगड. याच गडावर महाराजांचा राज्याभिषेक झाला. जवळपास २५ वर्ष ते राजगडावर होते, तर सर्वानुमते राजे झाल्यावर ७ वर्ष रायगडावरुन त्यांनी राज्यकारभार सांभाळला. पूर्वी रायरीचा डोंगर या नावाने ओळखला जाणारा आणि जावळीच्या मो-यांच्या ताब्यात असलेला हा डोंगर महाराजांनी समक्ष जाऊन पाहिला हा डोंगर इतर डोंगरापासून सरावलेला आणि सहजासहजी कुठल्याही बाजूने शत्रूस चढाई करता येणार नाही, असा असल्याने महाराजांनी राजधानीसाठी ह्याची निवड केली. गडाची उंची १२०० ते १५०० फूट आहे. म्हणजेच एकूण समुद्रसपाटीपासून रायगडाची उंची २९०० फूट आहे. रायगड कोकणात असल्यामुळे आणि उंची बरीच असल्यामुळे येथील हवा थंडगार असते. आता गडावर पाहण्यासारखे बरेच अवशेष आहेत.तसे पाहिले तर एका दिवसात गडावरील जागा पाहून होतात, पण ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी एक रात्र दोन दिवस मुक्काम करावा लागेल.

**साक्षी प्रदीप कदम - इ.९ वी**

## विज्ञानजगत

### सुगंधी फवारे घातक आहेत!

प्रसाधन करुन घराबाहेर पडताना फसफसणारा सुगंधी फवारा (एरोसोल स्प्रे) आपल्या कपडयांवर मारणं ही उच्चभ्रूपणाची एक कसोटी आहे. या फवा-यात असतो क्लोरो फ्लोरो कार्बन या वायुमुळे पृथ्वीच्या वातावरणाच्या वरच्या थरात असणा-या ओझोनचा नाश होतो. जेणेकरुन सूर्याचे अतिनील किरण थेट पृथ्वीवर येतात आणि कर्करोगाचं प्रमाण वाढवतात. एका अनावश्यक नख-याची केवढी ही भयंकर किंमत. त्याऐवजी मंद नैसर्गिक अत्तर वापरल तर, किंवा घमघमणा-या फुलांचं प्रसाधन केलं तर. आपल्या घराभोवती अशी सुगंधी फुलांची झाडे लावा आणि ती फुले प्रसाधानासाठी वापरा. सुगंधी फवा-याची कृत्रिमता टाळा. सौंदर्य हे सौम्यपणातून जाणवावं बटबटीतपणातून दुस-याला खुपू नये.

**शितल मनोहर हांडे - इ. ८वी**

**वाक्यप्रचार :** हरखून जाणे - गुंग होणे, आनंदी होणे
भान हरपणे - दंग होणे, जाणीव न उरणे

**म्हणी :** १) अती तिथे माती. २) काखेत कळसा आणि गावाला वळसा.

**शुभम मांजलकर - इ.९वी.**



# गुरुवंदना

**ब्रह्मानंद भवभयहरः केवलं ज्ञानमूर्ति**
**द्वंद्वातीतं गगनसदृश्यं तत्वमस्यादिलक्ष्यम।**
**एक नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं**
**भावातीत त्रिगुणरहित सदगुरु तं नमामि।**

## इतिहासात डोकावताना

# खुदीराम बोस



खुदीराम बोस

"आई मला परवानगी दे ना आत्ता, परत येतो बघ! १० महिने १० दिवसानंतर मी मावशीकडे जन्म घेईन अन आई, तू मला ओळखू नाही शकलीस ना, तर माझ्या गळ्याकडे बघ. तेथे तुला एक खूण दिसेल, अन् ती दिसताच तुला माझी ओळख पटेल. ती खूण म्हणजे फाशीच्या दोरखंडाचा व्रण" फासावर चढून हौतात्म्य पत्करणा-या अवघ्या १९ वर्षाच्या वंग युवकाचे हे अखेरचे उद्गार! त्याचे नांव खुदीराम बोस. भारतात बनविलेल्या दुस-या बॉम्बचे पृथ्थकरण कुठे करायचे अशी चर्चा योगी अरविंदांच्या शिष्यात सुरु असताना खुदीराम पुढे आला, म्हणाला जंगलात जाऊन माती दगडांवर परीक्षण करणं म्हणजे बॉम्ब फुकट घालविणं आहे. इंग्रज डोक्याखेरीज प्रयोगासाठी दुसरं योग्य स्थळ नाही. त्यांनी आपल्या मित्रासह किंग्जफोर्डच्या बग्गीवर बॉम्ब टाकला. प्रयोग यशस्वी झाला परंतू त्या बग्गीत केनेडी कुटुंबातील दोन स्त्रिया होत्या. पकडला गेला त्याक्षणापासून ११ ऑगस्ट १९०८ रोजी फासावर चढेपर्यंत तो सतत हसतमुख होता. फासावर चढून हौतात्म्य स्विकारणा-या या पहिल्या वंग युवकास अभिवादन!

**संपदा संतोष बागवे - इ. ८वी**

**डोके चालवा**



| | | |
|---|---|---|
| | | |
| | ९ | |
| | | |

या चौरसामध्ये १ ते १७ अंकामधील विषम संख्या (तो आकडा फक्त एकदाच आला पाहिजे) अशा त-हेने लिहा की प्रत्येक बाजूने म्हणजेच उभ्या, आडव्या, तिरप्या बाजूने बेरीज २७ येईल.

चार खंडांचे एक शहर, चार विहीर बिना पाणी, १८ चोर त्या शहरात, १ राणी, आला १ शिपाई सगळ्यांना मारुन मारुन विहिरीत टाकी. सांगा काय? **उत्तर पुढील अंकात.**



## शिक्षकदिनाच्या निमित्ताने

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्**

प्रतिवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन सर्वत्र साजरा होतो. एक आदर्श शिक्षक, द्रष्टा लेखक, सम्यक अभ्यासक, जगविख्यात तत्वज्ञ, प्रख्यात वक्ता, नीतीशास्त्रज्ञ, धर्मज्ञानी, देशाभिमानी, निरीच्छ वृत्तीने राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचलेले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा हा जन्मदिवस.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी तिरुपती क्षेत्रातील तिरुताणी येथे झाला. त्यांचे घराणे हे विद्वान पंडितांचे घराणे होते. घरात पूजापाठ, नामस्मरण, संस्कारांचे वातावरण होते. १२ मे १९५७ रोजी डॉ. राधाकृष्णन भारताचे राष्ट्रपती म्हणून निवडले गेले.

राष्ट्रपतीपदावरुन निवृत्त झाल्यावर पुढची आठ वर्षे त्यांनी वाचन, मनन, चिंतन व लेखनात घालवली. पवित्र आचरण, ऋषितुल्य जीवन म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन. त्यांच्यासारख्या आदर्श शिक्षकाचे चरित्र भारतालाच नव्हे तर जगाला मार्गदर्शक असे आहे.

मी शिक्षक आहे याचा त्यांना अभिमान होता. शिक्षणक्षेत्रात काम करणा-यांबाबत त्यांना आदर होता त्यांच्या मतांप्रमाणे भारत सरकारने ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. आदर्श शिक्षकांचा यावेळी सरकारतर्फे सन्मान केला जातो.

**संजना संतोष सादये - इ. १०वी**

## चंद्र लहान असूनसुद्धा सूर्यबिंबाला कसा काय झाकू शकतो

चंद्राचा गोल ३४७६ किमी व्यासाचा आहे, तर सूर्याचा गोल सुमारे १३,९२,००० किमी व्यासाचा आहे. अशा किमीमध्ये मोजलेल्या व्यासांना आपण रेषीय व्यास म्हणू. चंद्रबिंब लहान आहे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा आपण रेषीय व्यासांची तुलना करीत असतो. या दृष्टीने विचार केला तर सूर्याचा व्यास चंद्राच्या व्यासांच्या सुमारे ४०० पट आहे. आकाशात जेव्हा आपण चंद्र-सूर्यबिंब बघतो तेव्हा ते बिंब आपल्या डोळ्यांशी किती मापाचा कोन करते हे महत्वाचे असते. या व्यासाला आपण अंशात्मक व्यास म्हणू. यालाच कोनीय व्यास म्हणतात.
सूर्याचे सरासरी अंतर १४,९५,९७,९०० किमी आहे. पृथ्वी व चंद्र यांच्या पृष्ठभागामधील सरासरी अंतर ३,७६,२८४ किमी आहे. ४००पट मोठा असणारा सूर्य साधारण तितक्याच पटीने दूर आहे. म्हणून सूर्य मोठा असूनही त्याचा कोनीय व्यासाशी जुळता आहे. चंद्रबिंब आणि सूर्यबिंब यांचा कोनीय व्यास साधारण १/२ अंश म्हणजे ३० कला कोनीय मिनिटे आहे. म्हणून काही वेळेस चंद्रबिंब सूर्यबिंबाला झाकू शकते.

**संजना अजय अनभुले- इ. ७वी**

सदर त्रैमासिक प्रगती विद्यामंदीर, भांडुप तर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.



प्रगती मंडळ, साईहिल संचालित
प्रगती विद्या मंदीर
नरदास नगर, भांडुप, मुंबई
सा विद्या या विमुक्तये

# प्रगतीपर्व

वर्ष -१ अंक-३ सप्टेंबर-२०१८

## हितगुज....


शिक्षणामुळे माणसाची प्रगती होत असते. शिक्षणाचे ध्येय म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणे आणि हा सर्वांगीण विकास घडविण्याचे काम प्रगतीपर्व करत आहे. **प्रगतीपर्व,** या त्रैमासिकात प्रवासवर्णन, भाषिकखेळ, गणितीय कोडी, वैज्ञानिक प्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळजगत, ऐतिहासिक, सामाजिक, शालेय घडामोडी असे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडावा हा प्रगतीपर्वाचा मुख्य हेतू आहे.
शैक्षणिक क्षेत्रातील बदलती संकल्पना ज्ञानरचनावाद व सातत्यपूर्ण शिक्षणाद्वारे शाळेत निबंधस्पर्धा, नृत्यस्पर्धा, चित्रकलास्पर्धा, प्रश्नमंजूषा, वादविवादस्पर्धा, वार्षिक क्रिडामहोत्सव, वैज्ञानिकांचे मार्गदर्शन, दहावीच्या विद्यार्थ्यांना करीयर मार्गदर्शनासाठी समाजातील तज्ज्ञ व्यक्तींना आमंत्रित केले जाते. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना करुन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन तसेच सकारात्मक विचार रुजविणे हा **प्रगतीपर्व** चा प्रयत्न.

**श्रीम. प्रतिभा चव्हाण**

## शाळेतील घडामोडी :



**दीप अमावस्या :** आषाढ महिन्याच्या या अमावस्येलाच दीप अमावस्या म्हणतात. दीप लावण्यामागचे कारण म्हणजे आपण अज्ञानाचा अंधःकार दूर करुन जीवनात ज्ञानाच्या प्रकाशासाठी पुरुषार्थ करावा. विद्यार्थ्यांनी घरातून दिवे आणले व त्याची यथायोग्य पूजा करुन, प्रसाद वाटला अशा प्रकारे दीप अमावस्या सर्व विद्यार्थी, शिक्षक यांनी ११ ऑगस्ट २०१८ रोजी साजरी केली.



**रक्षाबंधन :** भाऊ-बहीणीच्या अतुट प्रेमाची साक्ष असलेला हिंदू संस्कृतीनुसार पवित्र सण म्हणजे रक्षा-बंधन. यादिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो म्हणून प्रार्थना करतात. यावर्षी २५ ऑगस्ट रोजी प्रगती शाळेमध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनींनी राखी बांधून साजरा करण्यात आला.